तरुण भारत

# आपल्या परसबागेत एक मधमाशी पेटी हवी : संदीप दिवाण

**गोकुळ शिरगाव :** निसर्गाची नवनिर्मिती... मध उत्पादन... शेतीची उत्पादकता.. आरोग्य निरोगी राहण्यासाठी... आपल्या प्रत्येकांच्या परसबागेत एक तरी मधमाशी पेटी गरजेची आहे. देश जगात परागीभवनच्या माध्यमातून मध उत्पादनाबाबत एक नंबर असेल, असे प्रतिपादन पोलीस अधिकारी संदीप दिवाण यांनी केले. येथील मधुअमृत मधमाशी संवर्धन संस्थेच्या मधमाशी प्रशिक्षण कार्यशाळेच्या सांगताप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. दोन दिवसीय मधुमक्षिका पालन कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी शिवाजी विद्यापीठ प्राणिशास्त्र विभागाचे डॉ. अधिकराव जाधव उपस्थित होते. कार्यशाळेत मधपेटीची रचना, मधमाशांचा जीवनक्रम, मधमाशांचे रोगाबद्दल डॉ. अधिकराव जाधव, धैर्यशील लाड, डॉ. शरद गलांडे, धर्माजी कांबळे, जोत्स्ना देसाई यांनी मार्गदर्शन केले. डॉ. पी. बी. तेली, डॉ. राहुल कांबळे, दयावान पाटील, सचिन देसाई संभाजी भगत यांचा संदीप दिवाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

तरुण भारत

# प्राणीशास्त्र विभागातर्फे आजपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने '२१ व्या शतकातील प्राणीशास्त्र'वर व्याख्यानमाला, सोमवारी, १७ रोजी सुरू होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती आहे. पहिल्या सत्रात मुंबईतील इंडोक्रोनॉजिस्ट डॉ. केरसी आवारी व स्टेट वाईल्डलाईफ बोर्डचे सदस्य सुहास वायंगणकर मार्गदर्शन करणार आहेत. शनिवारी, २२ जानेवारी रोजी प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे व डॉ. आर. के. कामत यांच्या उपस्थितीत व्याख्यानमालेचा समारोप होणार आहे.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून व्याख्यानमाला

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने '२१ व्या शतकातील प्राणीशास्त्र' या विषयावरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी (दि. १७) सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्याख्यानमालेचे उद्‌घाटन होईल.

पहिल्या दिवशी मुंबईतील इंडोक्रोनॉजिस्ट डॉ. केरसी आवारी व स्टेट वाईल्ड लाईफ बोर्डचे सदस्य सुहास वायंगणकर मार्गदर्शन करणार आहेत. दि. २२ रोजी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांच्या प्रमुख उपस्थितीत व्याख्यानमालेचा समारोप होईल. व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन सचिव डॉ. एस. एम. गायकवाड, समन्वयक प्रा. ए. ए. देशमुख यांनी केले आहे.